0 8 JUN 2023
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# शिवरायांनी नवसमाजनिर्मितीचा पाया घातला

## डॉ. नंदकुमार मोरे यांचे प्रतिपादन

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी महाराजांनी स्वराज्याचे बीज पेरले; मात्र हे काम सांघिक आहे, असा विचार त्यांनी पेरला. हेच त्यांच्या स्वराज्य निर्मितीचे गमक होय. स्वराज्यनिर्मितीतून त्यांनी नवसमाजनिर्मितीचा पाया घातला, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागामार्फत शिवस्वराज्य दिनानिमित्त आयोजित 'शिवरायांची स्वराज्याची संकल्पना' या विषयावरील व्याख्यानामध्ये ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के उपस्थित होते, तर




कोल्हापूर : शिवराज्याभिषेक दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात आयोजित व्याख्यानात बोलताना डॉ. नंदकुमार मोरे.

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. मोरे म्हणाले, भारताच्या दोन हजार वर्षांच्या इतिहासाच्या वाटचालीत कधी झाली नव्हती, अशी घटना ३५० वर्षांपूर्वी घडली, ती म्हणजे शिवराज्याभिषेक होय. छत्रपती शिवाजी महाराजांनी नूतन सृष्टी आणि नवीन स्वराज्य स्थापन केले. यातून नवसमाजरचनेचा पाया रचला गेला. शिवाजी महाराजांच्या कार्याचे निरीक्षण केले, तर त्यांच्याकडे कल्पकता, धाडसी वृत्ती, वैचारिक प्रगल्भता, दूरदृष्टी आणि सौजन्य दिसून येते. नवीन समाजरचना, नवीन राज्यव्यवस्था प्रत्यक्षात अमलात आणली, म्हणून त्यांच्या कार्याचे मोल अधिक आहे. दऱ्या-खोऱ्यांचा, जंगलांचा, झाडी-झुडपांचा, डोंगरकपारींचा आणि किल्ल्यांचा त्यांनी यथायोग्य वापर करून घेतला. ही सर्व त्यांची बलस्थाने ठरली. अनेक गडकिल्ले त्यांनी बांधून उभे केले. लष्कराची आणि रयतेची साधनसंपत्ती गडावर सुरक्षित राहील, याची दक्षता घेतली. आरमारामध्ये कोळी आणि बहुजन समाजातील लोकांना सामावून घेतले. लष्करामध्ये शेतकरी अधिक चांगल्या पद्धतीने काम करतो, हे छत्रपतींनी ओळखले होते आणि म्हणून त्यांना आपल्या आरमारामध्ये संधी दिली.

लोकमत

# शिवाजी महाराजांनी नवसमाज निर्मितीचा पाया घातला : मोरे

कोल्हापूर : शिवाजी महाराजांनी स्वराज्याचे बीज पेरले, मात्र हे काम सांघिक आहे, असा विचार त्यांनी पेरला. हेच त्यांच्या स्वराज्य निर्मितीचे गमक होय. स्वराज्य निर्मितीतून त्यांनी नवसमाज निर्मितीचा पाया घातला, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले.

विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागामार्फत मंगळवारी शिवस्वराज्य दिनानिमित्त आयोजित "शिवरायांची स्वराज्याची संकल्पना" या विषयावरील व्याख्यानात डॉ. मोरे बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी प्राचार्य डॉ. इस्माईल पठाण यांनीही मार्गदर्शन केले. इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी स्वागत केले. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत
08 JUN 2023

# स्वराज्याच्या सुकर वाटचालसाठी शिवराज्याभिषेक

## ज्येष्ठ इतिहास अभ्यासक डॉ. रमेश जाधव यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

छत्रपती शिवाजी महाराज यांनी कोणत्याही स्वार्थापायी नव्हे, तर कायदेशीर राजेपणाची मोहोर उमटवून स्वराज्याची वाटचाल सुकर करण्याच्या दृष्टीने राज्याभिषेक करवून घेतला. सन १५६५ मध्ये तालीकोटच्या लढाईमुळे विजयनगरचे साम्राज्य लयास गेल्यानंतर शतकभरानंतर पुन्हा एतद्देशीय राज्याची स्थापना जाहीर करणारा ऐतिहासिक क्षण होता, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. रमेश जाधव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र अधिविभाग, विद्यार्थी विकास विभाग आणि नेहरू अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने शिवराज्याभिषेक दिनानिमित्त डॉ. विलास संगवे स्मृती व्याख्यानमालेअंतर्गत डॉ. जाधव यांचे व्याख्यान आयोजित झाले. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. जाधव म्हणाले, शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक करवून घेणे ही विजयनगरच्या ऱ्हासानंतर या देशात घडलेली एक महत्त्वाची ऐतिहासिक घटना आहे. तत्कालीन संघर्ष एतद्देशीय आणि परकीयांमधील होता. त्यामुळे शिवरायांना कायदेशीर राजेपणाची मोहोर जनमानसावर सर्वदूर उमटविणे महत्वाचे वाटत होते. मोहिते-निंबाळकरांसारख्यांना 'आता मी राजा आहे,' असा संदेश राज्याभिषेकातून दिला. आंतरराष्ट्रीय अभ्यासकांनी शिवरायांच्या कार्याची दखल घेतल्यामुळेच इंग्रजीसह हिंदी, फारसी, डच, जर्मन, पोर्तुगीज इत्यादी भाषांमध्ये त्यांच्याविषयीची विपुल साधने आहेत. पश्चिम बंगालचे जदुनाथ सरकार यांनी औरंगजेबावरील संशोधन करताना शिवचरित्राकडे ते आकृष्ट झाले. औरंगजेबाच्या कट्टरतेला हिंदवी स्वराज्य स्थापन करून कर्तबगारी सिद्ध करणाऱ्या राजांकडे त्यांचे लक्ष वेधले. त्यातून त्यांनी अधिकृतपणे देशी-विदेशी साधनांचा अभ्यास करून शिवचरित्र साकारले. डॉ. बाळकृष्णही शाहू महाराजांच्या बोलावण्यावरुन पंजाबहून कोल्हापूरला आले आणि इथे शिवचरित्राच्या संशोधनात इतके रमले की इथलेच होऊन गेले.



कोल्हापूर : शिवस्वराज्य दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठातील आयोजित व्याख्यानात बोलताना डॉ. रमेश जाधव. सोबत डॉ. प्रल्हाद माने, डॉ. प्रतिभा देसाई, डॉ. एस. एन. पवार, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, डॉ. प्रतिमा

कुलगुरू डॉ. शिर्के अध्यक्षस्थानावरून म्हणाले, एकराष्ट्र भावनेची निर्मिती हा छत्रपती शिवाजी महाराजांचा स्वराज्य स्थापनेमागील सर्वात महत्त्वाचा हेतू होता. शिवरायांचे नियोजन कौशल्य, आकलन क्षमता, पराक्रम, शौर्य आदी बाबी स्तिमित करणाऱ्या आहेत. त्यांच्या विविध पैलूंचा आपण सातत्याने मागोवा घेत राहणे आवश्यक आहे.

समाजशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. प्रतिमा पवार यांनी प्रास्ताविक केले. नेहरू अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. आकाश ब्राह्मणे, सद्दाम मुजावर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रतिभा देसाई यांनी आभार मानले. यावेळी डॉ. एस. एन. पवार, डॉ. जगन कराडे, डॉ. आर. बी. पाटील, इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत, डॉ. अर्चना जगतकर, डॉ. अविनाश भाले आदी उपस्थित होते.

लोकमत

# ‘महाराष्ट्र धर्म’ विकसित होण्यात विचारवंतांचे योगदान

## अशोक चौसाळकर यांचे प्रतिपादन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : ‘महाराष्ट्र धर्म’ ही संकल्पना विकसित होण्यामध्ये संत व महानुभाव पंथांची भूमिका महत्त्वाची आहे. महाराष्ट्र राज्य निर्माण करणे हाच महाराष्ट्र धर्माचा उद्देश होता. महाराष्ट्र धर्म विकसित होण्यासाठी संत महानुभावापासून छत्रपती शिवाजी महाराज, टिळक, लोकहितवादी, वि. का. राजवाडे, न्यायमूर्ती रानडे, राजाराम शास्त्री भागवत या विचारवंतांचे योगदान आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. अशोक चौसाळकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्राच्या राज्यशास्त्र विषयांतर्गत ‘महाराष्ट्राची संकल्पना आणि लघु संशोधन प्रबंध सुलभ लेखन पद्धती’ या विषयावर शुक्रवारी ऑनलाइन कार्यशाळा झाली. यात चौसाळकर यांनी ‘महाराष्ट्र धर्म’ या विषयावर मांडणी केली. अध्यक्षस्थानी उपकुलसचिव डॉ. संजय कुबल होते. यावेळी उपकुलसचिव सी.



कार्यशाळेत डॉ. अशोक चौसाळकर यांनी “महाराष्ट्र धर्म”वर मांडणी केली.

एस. कोतमिरे यांसह विद्यार्थी, समन्वयक उपस्थित होते.

प्रा. डॉ. चौसाळकर म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात मराठीमध्ये राज्य व्यवहारकोष तयार केले. १९६० साली महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. त्यासाठी १०५ लोकांना आपला जीव गमवावा लागला ते महाराष्ट्र धर्मासाठी हुतात्मा झाले. डॉ. एस. डी. भोसले यांनी प्रास्ताविक केले. डॉ. एम. एम. मुजावर यांनी पाहुण्यांचा परिचय केला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 8 JUN 2023 तरुण भारत

# विद्यापीठाच्या परीक्षा सुरळीत

- महाविद्यालयांसह पालकांनी घेतली आपल्या पाल्याची काळजी

कोल्हापूर : कोल्हापूर बंद असल्याने परीक्षा घ्यायची की नाही यासंदर्भात विद्यापीठ प्रशासनाने पोलीस प्रशासनाबरोबर चर्चा करून परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला. बुधवारी सकाळ आणि दुपार अशा दोन्ही सत्रातील परीक्षा सुरळीत पार पडल्या. महाविद्यालयाने परीक्षेला आलेल्या विद्यार्थ्यांना त्यांचे पालक आल्यानंतरच गेटच्या बाहेर सोडले. महाविद्यालयासह पालकांनी आपल्या पाल्याला पेपरला सोडणे आणि घेवून येण्याचे काम केल्याने विद्यार्थ्यांना कोणतीच अडचण आली नाही, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत बुधवारी बी. ए. बी. एड, विधी आणि स्वायत्त महाविद्यालयांच्या वाणिज्य शाखेसह इतर विषयांच्याही परीक्षा होत्या. या परीक्षेला सकाळ आणि दुबारच्या सत्रात बहुतांश सर्वच विद्यार्थी उपस्थित होते. तरीही विद्यापीठ प्रशासनाने महाविद्यालयांकडून उपस्थित आणि अनुपस्थित राहिलेल्या विद्यार्थ्यांचा अहवाल मागवला आहे. हा अहवाल पाहून परीक्षेसंदर्भातील निर्णय घेतला जाणार आहे. परीक्षेला आलेल्या विद्यार्थ्यांना कोणताच त्रास झाला नाही, त्यामुळे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. जाधव यांनी समाधान मानले. केएमटीची सेवा बंद असल्याने ग्रामीण भागातील काही विद्यार्थ्यांना थोडासा त्रास सहन करावा लागला.

सकाळ

# पूर्वीचा पेपर दिलेल्या कॉलेजात शनिवारी फेरपरीक्षा

## विद्यापीठाचा निर्णय; सापडले ३५ कॉपी बहाद्दर



कोल्हापूर, ता. ७ : ज्या महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना ॲडव्हान्स अकौंटन्सी पेपर चार (टॅक्सेशन) पूर्वीचा पेपर दिला आहे. त्याठिकाणी संबंधित विषयाची फेरपरीक्षा शनिवारी (ता. १०) दुपारी २.३० ते ४.३० या वेळेत होणार आहे. दरम्यान, उन्हाळी सत्रातील पदवी परीक्षेत बुधवारी शिवाजी विद्यापीठाच्या भरारी पथकाने ३५ विद्यार्थ्यांना कॉपी करताना पकडले. त्यात कोल्हापूर जिल्ह्यातील २८, सातारामधील ६, तर सांगली जिल्ह्यातील एका विद्यार्थ्याचा समावेश आहे.

बी. कॉम. (सीबीएससी) भाग तीन सत्र सहा या अभ्यासक्रमाच्या परीक्षेतील ॲडव्हान्स अकौंटन्सी (टॅक्सेशन) विषयाचा पेपर एसआरपीडीद्वारे पहिल्यांदा दुपारी अडीच वाजता वितरीत केला. मात्र, काही अपरिहार्य कारणामुळे विद्यापीठाने हा पेपर रद्दबादल केला. त्या विषयाचा नवीन पेपर सर्व संबंधित महाविद्यालयांना वितरीत केला. पण, ज्या महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना नवीन पेपर वितरीत न करता पहिल्यांदा पुरविलेला पेपर वितरीत केला आहे, अशा सर्व महाविद्यालयामधील संबंधित विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा होणार आहे, अशी माहिती परीक्षा मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली. बॅचलर ऑफ लॉ., इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, शुगर टेक्नॉलॉजी, डिझाईन, आदी सहा अभ्यासक्रमांची परीक्षा बुधवारी झाली. त्यासाठी १२४३ विद्यार्थी उपस्थित होते.

तरुण भारत

# विद्यापीठ परीक्षेत ३५ गैरप्रकार

## ८ जून रोजीच्या सर्व परीक्षा नियोजित वेळापत्रकाप्रमाणे

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत सुरू असलेल्या उन्हाळी परीक्षेत बुधवारी ३५ गैरप्रकार झाले आहेत. परीक्षा प्रमाद समितीमार्फत संबंधीतांवर कारवाई केली जाणार आहे. तसेच ८ जून रोजीच्या सर्व परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसार होतील. तरी महाविद्यालये, विद्यार्थी आणि पालकांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत बुधवारी बॅचलर ऑफ लॉज (फाईव्ह इअर), बॅचलर ऑफ लॉज. (स्पेशल टेक्नॉलॉजी), बॅचलर ऑफ सायन्स (शुगर टेक्नॉलॉजी), बॅचलर ऑफ डिझाईन अशा सहा अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. या परीक्षेसाठी १ हजार २४३ विद्यार्थी उपस्थित होते. सर्व परीक्षा सुरळीत पार पडल्या असून, सर्व परीक्षा केंद्रांवर भरारी पथकांनी पाहणी केली.

या पाहणीत कोल्हापूर २८, सांगली १, सातारा ६ अशा एकूण ३५ गैरप्रकारांची नोंद भरारी पथकांनी परीक्षा प्रमाद समितीकडे केली आहे. संबंधितांवर परीक्षा प्रमाद समिती कारवाई करेल.

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत सुरू असलेल्या परीक्षेत ३१ मे रोजी बी. कॉम. भाग तीन सेमिस्टर सहाचा अडव्हान्स अकौंटन्सी पेपर नंबर चार फुटला होता. त्यामुळे विद्यापीठ प्रशासनाने हा पेपर रद्द करून दुसरी प्रश्नपत्रिका पाठवली होती. परंतु नऊ महाविद्यालयांनी पुन्हा पाठवलेली प्रश्नपत्रिका वितरीत न करता, फुटलेल्या प्रश्नपत्रिकेवरच पेपर घेतला. त्यामुळे संबंधित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा शनिवार १० जून रोजी दुपारी २.३० ते ४.३० या वेळेत घेतली जाणार आहे.